महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ३०१ वे दिनांक : २९/१०/२०२६ वार : गुरुवार

## शेतकरी आत्महत्यांवर संजय गायकवाड यांचे वादग्रस्त विधान

**मुंबई** : राज्यात शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न गंभीर बनलेला असताना शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी यासंदर्भात केलेल्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. शेतकरी आत्महत्या का करतात, असा सवाल करत त्यांनी आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अंत्यविधीला कोणीही जाऊ नये, असे विधान केले. तसेच, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे मृतदेह जनावरं खातील, तेव्हा त्यांना आपल्या निर्णयाची जाणीव होईल, असेही ते म्हणाले. शेतकऱ्यांनी संकटाच्या काळात आत्महत्येचा मार्ग न स्वीकारता सरकार, आमदार किंवा खासदारांकडे मदत मागावी, असे आवाहनही त्यांनी केले. मात्र, शेतकरी आत्महत्यांसारख्या अत्यंत संवेदनशील विषयावर वापरलेल्या भाषेमुळे त्यांच्या वक्तव्यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शेतकरी आत्महत्यांच्या प्रश्नावर बोलताना संजय गायकवाड यांनी शेतकऱ्यांना आत्महत्या न करण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांना काही अडचणी असतील, आर्थिक संकट असेल किंवा शेतीत नुकसान झाले असेल, तर त्यांनी सरकारकडे अथवा लोकप्रतिनिधींकडे मदत मागावी, असे ते म्हणाले. "तुम्ही का आत्महत्या करता? तुम्हाला काही प्रॉब्लेम असेल, तर सरकारला चिठ्ठी लिहा, आमदाराला लिहा, खासदाराला लिहा किंवा आम्हाला कळवा की माझ्यावर अशी संकटे आली आहेत. सगळे मिळून तुम्हाला मदत करतील," असे गायकवाड यांनी आपल्या वक्तव्यात म्हटले. शेतकरी आत्महत्या करून स्वतःचा जीव गमावतात आणि त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, असेही त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी आपल्या मुलाबाळांचा आणि कुटुंबाचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. संजय गायकवाड यांच्या वक्तव्यातील सर्वाधिक चर्चेत आलेला भाग म्हणजे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अंत्यविधीला कोणीही जाऊ नये, असे त्यांनी केलेले विधान. आत्महत्या केल्यामुळे कुटुंबावर होणाऱ्या परिणामांची जाणीव शेतकऱ्यांना व्हावी, या भूमिकेतून त्यांनी हे विधान केल्याचे त्यांच्या बोलण्यातून दिसते. "आत्महत्या जर कोणी केली, तर त्याच्या अंत्यविधीला पण कोणी गेले नाही पाहिजे. ज्यावेळेस आपला मृतदेह कोणीतरी जनावर खातं आणि आपले हाल कसे होतात, हे त्याला कळतं, तेव्हा तो आत्महत्या करणार नाही," असे गायकवाड म्हणाले. मात्र, आत्महत्या हा केवळ वैयक्तिक निर्णय नसून त्यामागे आर्थिक अडचणी, कर्जाचा वाढता भार, पिकांचे नुकसान आणि कौटुंबिक परिस्थिती यांसारखी अनेक कारणे असू शकतात. त्यामुळे अशा संवेदनशील विषयावर बोलताना वापरल्या जाणाऱ्या भाषेवरून प्रश्न उपस्थित होऊ शकतात.

## जमीन-जंगलांचे निर्णय कोण घेतंय? राज ठाकरेंचा सवाल; डेटा सेंटर्सवरून सरकारला घेरले

**रायगड** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कर्जतमधील इंटरनेट बंदी आणि जंगलतोडीच्या मुद्द्यावरून सरकारवर जोरदार टीका केली. इंटरनेट बंद करून माहिती जगापासून लपवता येणार नाही, असे म्हणत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच, जंगलतोडीमुळे अनेक वर्षांपासून उभी असलेली झाडे नष्ट होत असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्रातील जमिनी आणि जंगलांबाबतचे निर्णय नेमके कोण घेत आहे, असा सवाल करत त्यांनी केंद्रातील नेतृत्वाच्या दबावाखाली राज्याचा निर्णय होत असल्याचा आरोपही केला. कर्जतच्या सह्याद्रीच्या कुशीत टॉरेंट कंपनीच्या प्रकल्पासाठी चाललेल्या वृक्षतोडीविरोधात मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज थेट मैदानात उतरले आहेत. सकाळपासून बाधित परिसराची पाहणी केल्यानंतर, आता सायंकाळी कर्जतच्या पोलीस मैदानावरील सभेत राज ठाकरे यांनी भाषण केले. कर्जतमध्ये इंटरनेट सेवा बंद केल्याच्या मुद्द्यावर बोलताना राज ठाकरे यांनी सरकारच्या निर्णयावर टीका केली. इंटरनेट बंद केल्याने एखादी घटना जगापासून लपून राहणार नाही. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहिती काही वेळातच जगभर पोहोचू शकते, असे त्यांनी म्हटले. "अहो, इंटरनेट बंद जरी केलं, तरी काय सूर्य उगवायचा थांबतो काय? कोणत्या जगात राहतात मला कळत नाही ही माणसं," अशा शब्दांत राज ठाकरे यांनी सरकारवर निशाणा साधला. पुढे ते म्हणाले की, एखाद्या ठिकाणी इंटरनेट बंद केले, तरी अख्खे जग त्या घटनेकडे पाहत आहे. इंटरनेट बंद करून काय साध्य होणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. संबंधित व्हिडिओ अर्ध्या तासात यूट्यूबवर येईल आणि जगभरातील लोक तो पुन्हा पाहतील, असेही त्यांनी सांगितले. इंटरनेट बंदीमुळे माहिती प्रसारित होणे थांबणार नाही, असे सांगताना त्यांनी सरकारच्या या निर्णयामागील हेतूवरही प्रश्न उपस्थित केला. मनात काहीतरी काळेबेरे असेल, तरच अशा गोष्टी करण्याची वेळ येते. मन स्वच्छ असेल, तर सरकारवर इंटरनेट बंद करण्याची वेळ आली नसती, अशी टीका त्यांनी केली. इंटरनेट बंदीबरोबरच राज ठाकरे यांनी जंगलतोडीच्या मुद्द्यावरही तीव्र नाराजी व्यक्त केली. आज सकाळी आपण ज्या ठिकाणी झाडे तोडण्यात आली आहेत, त्या ठिकाणी गेलो होतो, असे त्यांनी सांगितले. तोडलेल्या झाडांची लाकडे एकत्र रचून ठेवण्यात आली होती. हा प्रकार पाहून आपल्याला अत्यंत वाईट वाटल्याचे त्यांनी नमूद केले. "ते बघतानाच इतकं वाईट वाटलं, मला असं वाटलं, मी जंगलाच्या अंतिम संस्काराला आलोय," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## EVM वर संजय राऊतांचा निशाणा; बॅलेट पेपरवर हुकूमशहाचा पराभव होतो



**मुंबई** : विधान परिषद निवडणुकीचे कल, राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मदत आणि ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणावरून शिवसेना (उबाठा) नेते खासदार संजय राऊत यांनी आज राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. 'आमदार-खासदार ५० कोटींना विकत घ्यायचे आणि शेतकऱ्यांना दिवाळीसाठी फक्त ५ हजार रुपये द्यायचे, ही शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा आहे,' असा हल्लाबोल करत राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना थेट आव्हान दिले आहे. राज्य सरकारने ३३ टक्के नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांचा अग्रीम देण्याचा निर्णय घेतला आहे, यावर राऊत कडाडून बरसले. ते म्हणाले, "मुख्यमंत्री खोटं बोलत आहेत. तुम्ही आमदार ५०-५० कोटींना विकत घेता, मतं १०-१० हजारांना विकत घेता आणि ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या हातावर ५ हजार रुपये टेकवता? ही शेतकऱ्यांची चेष्टा आहे. मी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर ११ हजार रुपये पाठवतो, त्यांनी त्या पैशात त्यांची दिवाळी साजरी करून दाखवावी." सावकारी आणि फायनान्स कंपन्यांच्या त्रासाला कंटाळून मराठवाड्यात दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. विधान परिषदेच्या निकालांवर भाष्य करताना राऊत म्हणाले की, पदवीधर मतदारसंघाचे निकाल महाविकास आघाडीसाठी आशादायी आहेत. मात्र, शिक्षक मतदारसंघाचा कल सरकारच्या बाजूने दिसत आहे. यावर गंभीर आरोप करताना ते म्हणाले, "गेल्या १० वर्षात या सरकारने शिक्षकी पेशात पैसे देऊन मते विकत घेण्याची परंपरा सुरू केली आहे. पुणे, अमरावती, नाशिकमध्ये १०-१० हजार रुपये वाटले गेल्याच्या बातम्या आहेत. शिक्षकांनी आपल्या पेशाला जागले पाहिजे, अशी जनतेची माफक अपेक्षा होती. मात्र, पुणे पदवीधरच्या मतदारांनी योग्य मार्ग दाखवला आहे." ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्याच्या परिणामाबाबत विचारले असता ते म्हणाले, "जिथे बॅलेट पेपरवर निवडणुका होतात, तिथे हुकूमशहाचा पराभव होतो, हा जगाचा इतिहास आहे. सर्बिया आणि ब्राझीलसारख्या देशांमध्ये बॅलेट पेपरमुळेच सत्तांतर झाले. आपल्याकडेही गोकुळ आणि विधान परिषदेच्या निवडणुका बॅलेट पेपरवर झाल्या, त्याचे परिणाम सर्वांसमोर आहेत." ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणावरून राऊत यांनी पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. "उपमुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात राम पूर्णेकरने आपल्या वडिलांच्या हत्येचे पुरावे समोर आणले आहेत. आरोपींसोबत राजेंद्र शिंदे मार्गदर्शन करताना दिसत आहेत. हाच पुरावा दुसऱ्या कुणाविरुद्ध असता, तर आतापर्यंत मोका लावला असता. मग मीनाक्षी शिंदे आणि राजेंद्र शिंदेंना अटक करण्याचे आदेश मुख्यमंत्री का देत नाहीत?" असा सवाल राऊत यांनी विचारला. तसेच, एसआयटी केवळ दिखावा असून ठाणे पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत? असे म्हणत ठाणे पोलीस दल बरखास्त करण्याची मागणी त्यांनी केली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६


## वसंतराव नाईक महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



**नांदेड (प्रतिनिधी) :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर घातली आहे. पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील सुवर्ण विजेतेपदासह बास्केटबॉल आणि बॉक्सिंग या खेळांमध्ये अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावरील स्पर्धांसाठी निवड झाली आहे.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नारायणराव चव्हाण लॉ कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सी झोन पॉवरलिफ्टिंग' स्पर्धेत महाविद्यालयाच्या करण जाधव याने ७४ किलो वजन गटात प्रथम क्रमांक तर ऋषिकेश वानखेडे याने ८४ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून दोघांनीही सुवर्ण पदकावर नाव कोरले आहे. तर प्रसाद गोरकट्टे याने द्वितीय क्रमांक संपादन केला. या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट ताकदीच्या जोरावर महाविद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली. तसेच, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेंटर झोन बास्केटबॉल स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या पल्लवी कैलास भालेराव, साक्षी दिलीप भालेराव आणि प्रेम दिलीप भालेराव या खेळाडूंची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धेच्या प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे.याशिवाय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सेंटर झोन बॉक्सिंग स्पर्धेत महाविद्यालयाच्या ओमकार मारतडे याने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. त्याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या निवडीमुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या सर्व यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य प्रोफेसर डॉ. शेखर घुंगरवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे, नियमित सरावाचे आणि जिद्दीचे कौतुक केले. क्रीडा क्षेत्रात यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण सराव, शिस्त, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी सर्व खेळाडूंना आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. आर. राठोड, कार्यालयीन अधीक्षक आर. डी. राठोड, प्रा. डॉ. ए. जी. गच्चे, प्रा. डॉ. उत्तम कानवटे आदी उपस्थित होते.या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. डॉ. साहेबराव मोरे, प्रा. डॉ. राहुल सरोदे, प्रा. डॉ. महेश जाधव यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यार्थी, प्राध्यापक आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. खेळाडूंना महाविद्यालयाकडून मिळणारे प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि सरावाच्या संधी यामुळे भविष्यातही महाविद्यालयाचे खेळाडू विद्यापीठ, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल यश संपादन करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.






## सत्तेच्या सारीपाटावर सगळे सोबतीला, तरीही सतीश चव्हाण यांचा पराभव



**बीड (भगवंत पाळवदे) :** राजकारणात सत्ता, पैसा, मोठी नेतेमंडळी आणि भक्कम निवडणूक यंत्रणा असली, तरी मतदारांच्या मनात स्थान निर्माण करता आले नाही, तर विजयाची खात्री देता येत नाही. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आ. सतीश चव्हाण यांच्या पराभवाच्या निमित्ताने हा राजकीय धडा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. गेल्या १८ वर्षांपासून पदवीधरांच्या राजकारणात प्रभाव राखणाऱ्या सतीश चव्हाण यांना यावेळी मतदारांनी धक्का दिल्याने मराठवाड्यातील राजकीय समीकरणांची नव्याने चर्चा सुरू झाली आहे.सतीश चव्हाण यांनी दीर्घकाळ पदवीधर मतदारांचा विश्वास संपादन केला होता. मात्र, कालांतराने मतदारांशी असलेला संवाद, त्यांच्या प्रश्नांवरील भूमिका आणि विकासकामांचा लेखाजोखा याबाबत नाराजी वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. निवडणुकीच्या काळात मतदारांशी संपर्क वाढविणे, विविध आश्वासने देणे आणि प्रचार यंत्रणेच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचणे एवढ्यापुरतेच राजकारण मर्यादित राहिल्याची टीका त्यांच्या विरोधकांकडून करण्यात येत होती. पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम करण्याऐवजी निवडणुकीच्या वेळीच सक्रिय होणाऱ्या नेतृत्वाला मतदारांनी यावेळी नाकारल्याचे या निकालातून स्पष्ट होत असल्याची चर्चा आहे. महायुतीतील नेत्यांनी घेतली विरोधाची उघड भूमिका अन्, पराभवाची नामुष्की ! या निवडणुकीत सतीश चव्हाण यांच्या विरोधातील राजकीय वातावरण अधिक तीव्र झाल्याचे दिसून आले. शिंदेसेनेचे मंत्री संजय शिरसाट, आमदार अब्दुल सत्तार, आमदार प्रशांत बंब यांच्यासह महायुतीतील विविध नेत्यांनी उघड विरोध केला त्यामुळे प्रतापसिंह पाटील यांच्या विजयासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्याचे मानले जात आहे. चव्हाण यांना पराभूत करण्यासाठी विविध राजकीय प्रवाहांतील नेते एकत्र आल्याचे चित्र या निवडणुकीत दिसले.प्रतापसिंह पाटील यांना निवडणुकीचा मोठा अनुभव नसल्याची चर्चा असतानाही त्यांना मिळालेला पाठिंबा महत्त्वाचा ठरला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याचे नियोजन आणि संघटनात्मक काम या लढतीत महत्त्वाचे ठरल्याचे राजकीय निरीक्षकांकडून सांगितले जात आहे. उमेदवाराची वैयक्तिक प्रतिमा, पक्षीय समीकरणे, स्थानिक नेतृत्वाचे प्रयत्न आणि मतदारांचा बदललेला कल या सर्व घटकांचा निकालावर परिणाम झाल्याचे मानले जात आहे. बॅनरवरील चेहरे आणि राजकीय नाराजीची ठिणगी! या निवडणुकीत प्रचाराच्या बॅनरवरील छायाचित्रांनाही राजकीय महत्त्व प्राप्त झाले. राज्यातील प्रमुख नेत्यांना काही प्रचारबॅनरवर स्थान न दिल्याने नाराजी निर्माण झाल्याची चर्चा होती. विशेषतः बीड जिल्ह्यात प्रभाव असलेल्या ओबीसी नेतृत्वातील ना.पंकजाताई मुंडे आणि आ.धनंजय मुंडे यांचे छायाचित्र जालना जिल्ह्यातील काही प्रचारबॅनरवर नसल्याचा मुद्दा चर्चेत आला. या प्रकारामुळे बीड जिल्ह्यातील काही पदवीधर मतदारांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.निवडणुकीतील विजयासाठी स्थानिक परिस्थितीनुसार प्रचाराचे नियोजन करणे आवश्यक असते; मात्र त्याचवेळी मित्रपक्षांचे नेते, त्यांचे समर्थक आणि विविध सामाजिक घटकांच्या भावनांचा विचार करणेही तितकेच महत्त्वाचे असते. प्रचारातील अशा बाबींमुळे मतदारांच्या मनात निर्माण झालेली नाराजी मतदानाच्या वेळी कोणत्या स्वरूपात व्यक्त होते, हे या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे. पदवीधरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याची टीका पदवीधर मतदारसंघ हा केवळ राजकीय प्रतिष्ठेचा विषय नसून सुशिक्षित बेरोजगार, नोकरीतील विविध समस्या, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न आणि पदवीधरांच्या हक्कांसाठी आवाज उठविण्याचे व्यासपीठ आहे. त्यामुळे या मतदारसंघातून निवडून येणाऱ्या प्रतिनिधीकडून सातत्यपूर्ण कामाची अपेक्षा असते. सतीश चव्हाण यांच्या कार्यपद्धतीवर टीका करणाऱ्या मतदारांनी आणि राजकीय विरोधकांनी पदवीधरांच्या प्रश्नांवर अधिक ठोस भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली होती.पुणे येथे पदवीधरांच्या प्रश्नांसंदर्भात झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवरही चव्हाण यांच्या भूमिकेवर टीका झाल्याचे सांगितले जात आहे. पदवीधरांच्या प्रश्नांशी प्रत्यक्ष जोडले जाणे, आंदोलनस्थळी उपस्थित राहणे आणि त्यांच्या मागण्यांसाठी प्रभावी पाठपुरावा करणे या बाबी मतदारांच्या अपेक्षांमध्ये महत्त्वाच्या होत्या. या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत, अशी भावना काही मतदारांमध्ये निर्माण झाल्याचे या पराभवाच्या विश्लेषणातून पुढे येत आहे. सहानुभूतीपेक्षा मतदारांनी निवडला बदलाचा पर्याय! या निवडणुकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या वातावरणाचाही राजकीय चर्चेत उल्लेख होत आहे. मात्र, सहानुभूतीचे वातावरण असले तरी मतदान करताना मतदारांनी स्थानिक प्रश्न, नेतृत्वाची कार्यपद्धती आणि बदलाची गरज यांना प्राधान्य दिले असावे, असे मानले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकीय वर्तुळातच वेगळ्या नेतृत्वाला संधी मिळाल्याने या निकालाला आणखी एक राजकीय संदर्भ प्राप्त झाला आहे. तगडी यंत्रणा अपयशी; जनमताचा अंदाज चुकला! सतीश चव्हाण यांच्याकडे मजबूत निवडणूक यंत्रणा, अनुभवी कार्यकर्ते आणि राजकीय संपर्कांचे मोठे जाळे होते. मात्र, केवळ संघटनात्मक ताकद आणि प्रचारातील संसाधने यांच्या जोरावर निवडणूक जिंकता येत नाही, हे या निकालाने दाखवून दिले. मतदारांशी थेट संवाद, कार्यकर्त्यांशी समन्वय, स्थानिक प्रश्नांची जाण आणि सामान्य मतदारांच्या अपेक्षांचा आदर या गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात.ठराविक व्यक्तींच्या वर्तुळात राहणे, विरोधी मतांकडे दुर्लक्ष करणे आणि राजकीय वर्चस्वाबाबत अतिआत्मविश्वास बाळगणे यामुळे नेतृत्व जनतेपासून दूर जाऊ शकते. चव्हाण यांच्या पराभवाच्या निमित्ताने अशा कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दुसरीकडे, प्रतापसिंह पाटील यांना मिळालेला पाठिंबा हा केवळ एका उमेदवाराच्या बाजूने झालेला कौल नसून, प्रस्थापित नेतृत्वाला पर्याय देण्याच्या मतदारांच्या इच्छेचे प्रतिबिंब असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. सत्तेचा अहंकार मतपेटीत उतरतोच असे नाही! या निवडणुकीचा सर्वांत महत्त्वाचा संदेश म्हणजे राजकारणात कोणताही विजय कायमस्वरूपी नसतो. अनेक वर्षे मतदारांचे प्रतिनिधित्व केले म्हणून त्यांचा पाठिंबा कायम राहील, असे गृहीत धरणे धोकादायक ठरू शकते. मतदारांच्या अपेक्षा बदलतात, प्रश्न बदलतात आणि त्यानुसार मतदानाचा निर्णयही बदलतो. त्यामुळे सत्ता, पैसा आणि नेत्यांची फौज यापेक्षा मतदारांशी असलेले नाते अधिक महत्त्वाचे असते.प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाच्या निमित्ताने विरोधी गटातील अनेकांना राजकीय समाधान मिळाले असले, तरी या निकालाचा खरा अर्थ पदवीधर मतदारांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांमध्ये शोधावा लागेल. मतदारांनी दिलेला कौल हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा नेत्याचा विजय-पराजय एवढ्यापुरता मर्यादित नसून, लोकशाहीत जनमत सर्वोच्च असल्याची आठवण करून देणारा आहे."अब ऊंट पहाड़ के नीचे आयेगा!" अशी प्रतिक्रिया या राजकीय घडामोडींनंतर व्यक्त होत असून, सत्तेचा अहंकार आणि जनमत यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे."सत्ता का गुरूर अब टूटता नजर आ रहा है,मराठवाड़ा का मिज़ाज बदलता नजर आ रहा है!ये जनता है जनाब, जब हिसाब करती है,बड़े-बड़ों की सियासत भी खामोश करती है!"पदवीधर मतदारसंघाच्या या निकालाने राजकीय नेत्यांसमोर एकच प्रश्न उभा केला आहे— मतदारांना केवळ निवडणुकीच्या काळात गृहीत धरायचे, की पाचही वर्षे त्यांच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे काम करायचे? कारण अखेरीस सत्ता नेत्यांकडे असली, तरी तिचा कौल देण्याचा अधिकार जनतेकडेच असतो.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६

## पैसे कमवायला लागल्यावर कळाले, फटाके स्वस्त नव्हते तर वडिलांचे हृदय मोठे होते

लहानपणी दिवाळी म्हणजे आनंदाचा उत्सव असायचा. नवीन कपडे, फराळाचा सुगंध, घरासमोरच्या पणत्यांची रोषणाई, आकाशात उडणारे रंगीबेरंगी फटाके आणि घरात सगळ्यांच्या चेहऱ्यावर असणारे हसू... दिवाळी आली की मनाला एक वेगळाच आनंद व्हायचा. त्या आनंदामागे किती कष्ट लपलेले आहेत, घर चालवताना आई-बाबांना किती तडजोडी कराव्या लागतात, याची जाणीव मात्र त्या वयात कधीच झाली नाही. कारण आपण मुलं असतो, आपल्याला फक्त आपला आनंद दिसत असतो; पण त्या आनंदासाठी आई-वडील स्वतःच्या कितीतरी इच्छा बाजूला ठेवत असतात, हे समजायला आयुष्याचा बराच काळ जावा लागतो.लहानपणी दिवाळीच्या आधी वडिलांच्या मागे लागून फटाके मागायचो. कधी फुलबाज्या, कधी लवंगी फटाके, कधी भुईचक्र, तर कधी आकाशात उडणारे रॉकेट... आपल्या मित्रांकडे जे फटाके असायचे ते आपल्याकडेही असावेत, असा हट्ट असायचा. वडील बाजारातून फटाक्यांची पिशवी घेऊन घरी यायचे, तेव्हा जणू काही संपूर्ण जग जिंकल्याचा आनंद व्हायचा. त्या पिशवीत किती रुपये खर्च झाले असतील, त्यासाठी वडिलांनी किती तास घाम गाळला असेल, किती गरजा पुढे ढकलल्या असतील, याचा विचार कधी मनाला शिवलाच नाही. आपल्याला फक्त फटाके दिसायचे, त्यामागचा बाप दिसत नव्हता.आणि आई... आईचं जगणं तर काटकसरीचं एक जिवंत उदाहरण असायचं. दिवाळीचा फराळ करायचा, घर स्वच्छ करायचं, मुलांचे कपडे घ्यायचे, घरातल्या प्रत्येकासाठी काही ना काही करायचं. बाजारात गेल्यावर आई स्वतःसाठी एखादी साडी घ्यायची म्हटली, तर दहा वेळा किंमत विचारायची. एखादी वस्तू आवडली तरी, "राहू दे, पुढच्या वेळी घेऊ" असं म्हणून ती स्वतःची इच्छा सहजपणे बाजूला ठेवायची. मात्र मुलांच्या कपड्यांमध्ये, त्यांच्या फराळामध्ये किंवा दिवाळीच्या आनंदामध्ये कधी काटकसर करायची नाही. घरातल्या डब्यात किती पैसे शिल्लक आहेत, महिन्याचा खर्च कसा भागवायचा, कोणत्या वस्तूला किती खर्च करायचा, याचा हिशोब तिच्या मनात सतत सुरू असायचा. वडील पैसे कमवायचे आणि आई त्या पैशातून संपूर्ण घराचं जगणं उभं करायची.वडील मुलांच्या चेहऱ्यावर हसू पाहण्यासाठी पैसे खर्च करायचे, तर आई तेच पैसे पुरवून संपूर्ण घराचा आनंद जपायची. वडिलांच्या खिशात पैसे कमी असले तरी मुलांच्या आनंदासाठी त्यांचा हात कधी आखडता नसायचा आणि आईच्या हातात पैसे असले तरी स्वतःसाठी खर्च करताना तिचं मन नेहमीच मागे सरकायचं. एकाच घरात प्रेम व्यक्त करण्याच्या या दोन वेगळ्या पद्धती होत्या. वडिलांचं प्रेम फटाक्यांच्या आवाजात ऐकू यायचं, तर आईचं प्रेम फराळाच्या प्रत्येक घासात जाणवायचं.पण आयुष्य जसजसं पुढे सरकत गेलं, तसतशी परिस्थितीची जाणीव होऊ लागली. स्वतः कमवायला लागलो, घरखर्च समजू लागला, मुलांच्या गरजा भागवताना पैशांची किंमत कळू लागली, तेव्हा अचानक लहानपणीच्या दिवाळीची आठवण मनाला चटका लावून गेली. आज बाजारात फटाक्यांच्या किमती पाहताना मनात एक विचार येतो, आपण लहानपणी मागितलेले ते फटाके खरंच स्वस्त होते का? नाही! फटाके स्वस्त नव्हते, तर वडिलांचे हृदय खूप मोठे होते. आपल्या आनंदासाठी त्यांनी स्वतःच्या कितीतरी गरजांना कात्री लावली होती. आणि आईची काटकसर ही गरिबी नव्हती, तर आपल्या कुटुंबाचा आनंद टिकवून ठेवण्याची तिची एक निःशब्द धडपड होती.आज आपण स्वतःच्या मुलांसाठी फटाके घेतो, नवीन कपडे घेतो, फराळ करतो; पण त्या प्रत्येक गोष्टीमागे खर्चाचा हिशोब करताना आई-वडिलांची आठवण येते. पूर्वी वडील आपल्या हातात फटाक्यांची पिशवी द्यायचे, आज आपण आपल्या मुलांच्या हातात ती पिशवी देतो. फरक एवढाच आहे की, पूर्वी त्या पिशवीत आपला आनंद असायचा आणि आज त्या पिशवीतून वडिलांच्या कष्टांची आठवण बाहेर येते. पूर्वी आईने केलेला फराळ सहज खायचो, आज तिच्या हातच्या त्या चवीची सर जगातल्या कोणत्याही महागड्या मिठाईला येत नाही, हे समजतं.काळ बदलला, घरं बदलली, दिवाळी साजरी करण्याच्या पद्धती बदलल्या; पण आई-वडिलांच्या प्रेमाची श्रीमंती कधीच बदलली नाही. आज घरात कितीही रोषणाई केली, महागडे फटाके आणले, हजारो रुपयांची खरेदी केली, तरी लहानपणी वडिलांनी आणलेल्या त्या छोट्याशा फटाक्यांच्या पिशवीतला आनंद पुन्हा विकत घेता येणार नाही. आईने पहाटे उठून केलेल्या फराळाचा सुगंध पुन्हा तसाच अनुभवता येणार नाही. कारण त्या आनंदाची किंमत पैशांत नव्हती, ती आई-वडिलांच्या प्रेमात होती.खरं सांगायचं तर दिवाळीत घर उजळवण्यासाठी आपण पणत्या लावतो, पण आपल्या आयुष्याचा अंधार दूर करण्यासाठी आई-वडिलांनी स्वतःचं संपूर्ण आयुष्य पणतीसारखं जाळलं असतं. वडील उन्हातान्हात कष्ट करत राहिले, आई संसाराच्या चुलीवर स्वतःच्या इच्छा भाजत राहिली आणि आपण मात्र त्या दोघांच्या त्यागाच्या प्रकाशात आपलं बालपण आनंदाने जगत राहिलो.आजही दिवाळी आली की मनात एकच इच्छा होते...! पुन्हा एकदा लहान व्हावं, वडिलांच्या बोटाला धरून फटाक्यांच्या दुकानात जावं, आईच्या हातचा फराळ खावा आणि दिवाळीच्या रात्री त्या दोघांच्या मध्ये बसून आकाशात उडणारे फटाके पाहावेत. तेव्हा पैशांची चिंता नसायची, भविष्याची काळजी नसायची, फक्त आई-बाबा सोबत आहेत, एवढंच पुरेसं असायचं.आयुष्याने एक गोष्ट मात्र खूप उशिरा शिकवली... वडिलांनी आणलेले फटाके कधीच महाग नव्हते, आईने केलेला फराळ कधीच साधा नव्हता आणि त्यांचं प्रेम कधीच सामान्य नव्हतं. महाग होती ती त्यांची मेहनत, अमूल्य होता त्यांचा त्याग आणि अनमोल होतं त्यांचं अस्तित्व!म्हणून या दिवाळीत घरातल्या रोषणाईसोबत आई-वडिलांच्या चेहऱ्यावरही आनंदाची पणती लावा. कारण आपण लहान असताना त्यांनी आपला प्रत्येक सण मोठा केला; आता त्यांचं उरलेलं आयुष्य आनंदाने उजळवण्याची वेळ आपली आहे. उद्या घरात फटाक्यांचा आवाज असेल की नसेल, पण आई-वडिलांचा आशीर्वाद डोक्यावर असेल, तर तीच आपल्या आयुष्यातील सर्वात मोठी आणि खरी दिवाळी असेल!कारण फटाके संपतात, रोषणाई विझते, फराळ संपतो... पण आई-वडिलांनी दिलेल्या प्रेमाची ऊब आयुष्यभर मनात तेवत राहते!



**प्रा. डॉ. सतिश लिला नामदेव दोडके, ठाणे**

## आरसा एकदा स्वतःलाही दाखवा!

जर तुम्हाला सगळेच नाकारत असतील,
तर जगाला दोष देण्याआधी
एकदा स्वतःच्या मनात
डोकावून पाहा!

प्रश्न स्वार्थाचा आहे की
भाषेचा?
विचारांचा आहे की
खोटारडेपणाचा?
चेहऱ्यावरच्या मुखवट्याचा
आहे की
अंतरंगातल्या ढोंगीपणाचा?

तुमचे संस्कार चुकलेत की
चारित्र्य घसरलेय?
तुमच्या शब्दांत विष आहे की
वागण्यात अहंकार?
तुमच्या सत्याला धार आहे की
खोटेपणालाच तुम्ही दिलाय
सत्याचा श्रृंगार?

प्रत्येक वेळी जगच चुकीचे
कसे?
स्वार्थी प्रवृत्ती दुःखी करते
आतून
प्रत्येक जखम दुसऱ्यानेच
दिलेली नसते,
आपल्याच शब्दांने आणि
स्वभावाने खुपसलेला असतो
खंजीर!
आपल्याच पोटात...

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**

## शांतीचा प्रतीक

आकर्षक व सुंदर
कबुतर पक्षी
जांभळ्या ठिपक्यांची
मानेवर नक्षी

पुर्वी संदेश वहनाचे
कार्य करे भारी
इतर पक्ष्यापेक्षा
कला त्याची न्यारी

कबुतराची स्मरणशक्ती
विलक्षण व अफाट
दूर गेला तरी
विसरत नाही वाट

काळे दोन पट्टे
पंखावर शोभे छान
गुटर गूं गुटर गूं
गातो सदा गान

कबुतराचा रंग
राखडी तपकिरी
शांतीचा प्रतीक
म्हणतात त्याला सारी



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## विनयकुमार सोनवणे यांना स्वाभिमानी लेखणीचा गौरव पुरस्कार



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील तुगाव येथील रहिवासी असलेले विनयकुमार विश्वास सोनवणे यांना नुकताच स्वाभिमानी पत्रकार संघाच्या ,दैनिक चालू वार्ता समूहाच्या वतीने स्वाभिमानी आणि निर्भीड लेखणीसाठीचा स्वाभिमानी गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या ३१ ऑक्टोबर रोजी एका विशेष समारंभात रोख रक्कम व सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कारपूर्वक सन्मान करण्यात येणार आहे.विनयकुमार सोनवणे हे शिक्षण,साहित्य,सामाजिक प्रबोधन ,संविधान जागृती आणि पुरोगामी चळवळीमध्ये कार्यरत असलेले एक अभ्यासू शिक्षक,प्रभावी वक्ते,साहित्यिक आणि सामाजिक कार्याला वाहून घेतलेले एक चिंतनशील व्यक्तिमत्व आहे.शिक्षण,सामाजिक बांधिलकी ,गुलामी मानसिकतेचे सत्व जोपासणाऱ्या जुन्या रूढी,परंपरा ,कर्मकांड आणि परिवर्तनवादी विचारांचा प्रसार हेच त्यांच्या कार्याचे प्रमुख वैशिष्टे आहे.सध्या त्यांचा नवनिर्माण हा कवितासंग्रह विशेष गाजतो आहे. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणे ,सामाजिक कार्यकर्ते म्हणून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे ,साहित्यिक म्हणून समाजातील वास्तव मांडणे आणि वक्ते म्हणून महापुरुषांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे अशा विविध भूमिका ते सातत्याने आणि समर्थपणे पार पाडत असतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६

## डॉ. नारायण शिवशेट्टे यांना संत नामदेव राष्ट्रीय समीक्षा पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी) :** हिंगोली येथील समृद्धी प्रकाशन यांच्यावतीने दिला जाणारा २०२६ चा संत नामदेव राष्ट्रीय समीक्षा पुरस्कार प्रा. डॉ. नारायण शिवशेट्टे यांच्या 'ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय : एक अभ्यास' या समीक्षा ग्रंथास जाहीर झाला आहे. संत नामदेव राष्ट्रीय समीक्षा पुरस्कार समृद्धी प्रकाशनाचे मुख्य संयोजक प्रा. डॉ. श्रीराम मारोतीराव कऱ्हाळे यांनी पुरस्कार निवडीबाबतची माहिती पत्राद्वारे कळविले आहे. डॉ. नारायण शिवशेट्टे यांना यापूर्वी भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार कोपरगाव, राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन व साहित्य सेवा कार्य गौरव पुरस्कार टाकळीभान यासह अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचे 'रातवा : आत्मसंघर्ष आणि आत्मशोध',' विद्यार्थ्यांची कविता' (सहसंपादक) हे ग्रंथ प्रकाशित आहेत. ग्रामीण साहित्य व आत्मचरित्र हा त्यांचा विशेष अभ्यासाचा विषय असून त्यांनी अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन व लेखन केले आहेत. डॉ. नारायण शिवशेट्टे सध्या पानसरे महाविद्यालय अर्जापुर ता. बिलोली जि. नांदेड येथे मराठी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या पुरस्कार निवडीबद्दल हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य , सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शैक्षणिक , साहित्य व मित्र परिवारातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे...

## अय्युब पठाण यांचे चाळीस वर्षापासून साहित्य लेखन



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** पैठण तालुक्यातील लोहगाव ता. पैठण येथील सुप्रसिद्ध साहित्य तथा बँड मास्तर अय्युब पठाण लोहगावकर हे मराठी साहित्य लेखनामध्ये सातत्याने गेल्या 40 वर्षापासून दर्जेदार लेखन करून सामाजिक कार्य करीत आहे. आजपर्यंत अय्युब पठाण यांना विविध सेवाभावी संस्था व संघटना यांच्याकडून सत्तर राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार मिळालेले असून त्यांची कथा आणि कविता बालभारतीच्या अभ्यासक्रमात आणि विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे.सध्या अय्युब पठाण हे बिडकीन ता. पैठण येथील भारतनगरमध्ये वास्तव्याला असून ते सेवानिवृत्त शिक्षक आहे. त्यांची आतापर्यंत 15 पुस्तके प्रकाशित असून त्यामध्ये दहा बालकविता संग्रह, चार कथासंग्रह, आणि एक ललित लेखसंग्रह यांचा समावेश आहे . श्री. पठाण यांचा जन्म एका मुस्लिम समाजामधील गरीब कुटुंबात झालेला असून घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीला साहित्याचा लवलेस ही नसताना श्री. पठाण यांनी मराठी साहित्यामध्ये साहित्य लेखन करून त्यांना जगतांना जीवनात आलेल्या प्रत्येक संकटावर संघर्षाने मात केलेली आहे. परंतु त्यांच्या विकासामध्ये त्यांना मुस्लिम ही जात पदोपदी आडवी आलेली आहे. तरीही ते डगमगले नाहीत. त्यांनी आपले कार्य व आपले दर्जेदार लिखाण चालूच ठेवले आहे. आणि सध्याही ते लेखन करीत आहे. म्हणून श्री. पठाण हे आज महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध साहित्यिक म्हणून त्यांची ओळख आहे. तरीही या साहित्यिकाला समाजातील अनेक विविध वर्तमान पत्राने त्यांच्या साहित्याची दखल घेतलेली आहे. यातून त्यांना साहित्य लेखनाची प्रेरणा व प्रोत्साहन मिळत असून त्यांचे अभिनंदन व कौतुकही होत आहे. वाचकांनी आणि समाजाने त्यांना पुढील साहित्य लेखनास कळत नकळत शुभेच्छा सुद्धा दिलेल्या आहेत. त्याबद्दल पठाण हे त्यांचे उपकार मनापासून मानत असून त्यांना धन्यवाद देत आहे.

# मुरूममध्ये कोजागिरी पौर्णिमेनिमित्त रंगली दर्जेदार 'काव्य मैफिल'!




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून येथील बसव सहकार भवनमध्ये आयोजित 'कोजागिरी काव्य मैफिलीत' रसिकांनी कविता व गीतांचा बहारदार आनंद घेतला. श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था, महात्मा बसवेश्वर सार्वजनिक ग्रंथालय आणि रोटरी क्लब मुरूम सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता. २५) हा साहित्यिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन शरणाप्पा मुदकण्णा हे होते. यावेळी मंचावर पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे, रोटरीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सेवानिवृत्त प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, रोटरीचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर स्थानिक व परिसरातील कवींनी आपल्या ओघवत्या वाणीतून विविधरंगी कविता सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या काव्य मैफिलीत कवींनी विविध घटना, प्रसंग आणि वास्तव जीवनावर आधारित कविता सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.कविवर्य सहशिक्षक रुपचंद ख्याडे यांनी निसर्गाची होणारी हानी अधोरेखित करताना म्हटले," प्लास्टिकच्या या जंगलामध्ये, सिमेंटची घरे माजली... हिरवी धरती कोमेजून..."चेअरमन शिवशरण वरनाळे यांनी सत्याचे महत्त्व मांडताना," सत्य हे निर्भय असते, सत्य हे शिव असते... निर्विवाद सत्य असे की सत्य हे सत्यच असते!" ही कविता सादर केली.मुख्याध्यापक विजयकुमार देशमाने यांनी " नद्या आटल्या, तलाव सुकले, पक्षी झाले बेजार... थेंबासाठी आसुसलेली, धरती झाली लाचार..." या शब्दांत दुष्काळी वास्तवाचे दर्शन घडवले.कलाप्पा पाटील यांनी पावसाची अनिर्दिष्टता आणि धरणीच्या वेदना प्रभावीपणे मांडल्या," पावसाळी नक्षत्र सारी कोरडीच गेली, उगवून आलेल्या पिकांची होळीच झाली... भेगा पडून धरणीचं काळीज फाटलं!"सुनील नरसिंग राठोड यांनी भूक, संघर्ष आणि सृष्टीचे चक्र यावर आधारित ओळी सादर केल्या," पृथ्वीच्या पोटातून प्रतिकार करुनी उगवले अंकुर..."बाळासाहेब गिरीबा यांनी जिद्द आणि संघर्षाचा संदेश देणारी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली,"रडू नको...! रडून कुणी पाहील नाही... शेवटी पानांनीही साथ सोडली, पण पळयानं बहरनं सोडली नाही!"याप्रसंगी रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, सेवानिवृत्त मुख्याध्यापक काशिनाथ निर्मळे, मल्लिकार्जुन बदोले, अशोक जाधव, अमृत वरनाळे, मनीष मुदकन्ना आदींची विशेष उपस्थिती होती. संतोष कांबळे यांनी प्रास्ताविक व मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना शरणाप्पा मुदकण्णा यांनी अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील साहित्यिक आणि सांस्कृतिक जोपासना होत असल्याचे गौरवोद्गार काढले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, चिदानंद स्वामी, प्रशांत काशेट्टी, सचिन कंटेकूरे, राजू मुदकण्णा, महांतय्या स्वामी, संतोष मुदकण्णा आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सहशिक्षक बालाजी भोसले यांनी तर आभार प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांनी मानले.



## फुले-शाहू-आंबेडकर-पेरियार यांच्या विचारांचा बौद्ध तत्त्वज्ञानाशी अनुबंध उलगडणार

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद व मराठी विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागसेनवन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘संवाद प्रतिभावंतांशी’ या सृजनशील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता महाविद्यालयाच्या परिसरात हा कार्यक्रम होणार आहे.या कार्यक्रमात आंबेडकरी विचारवंत व ज्येष्ठ साहित्यिक भीमराव सरवदे हे ‘फुले, शाहू, आंबेडकर, पेरियार यांच्या विचारांचे सूत्र : बौद्ध तत्त्वज्ञानात’ या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरोगामी विचारवंत डॉ. सुधाकर नवसागर असतील. महाविद्यालयाचे उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा. नागनाथ करडे हे प्रास्ताविक करतील.महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार यांच्या विचारांमध्ये सामाजिक समता, मानवी प्रतिष्ठा, विवेकनिष्ठा, जातिव्यवस्थेचा विरोध आणि शोषणमुक्त समाजनिर्मितीचा समान धागा आढळतो. या विचारपरंपरेचा बौद्ध तत्त्वज्ञानाशी असलेला वैचारिक अनुबंध समजून घेण्याची संधी या व्याख्यानातून मिळणार आहे. समकालीन सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर या महापुरुषांच्या परिवर्तनवादी विचारांचे महत्त्व अधोरेखित करणे, हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. नवनाथ गोरे, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे आणि डॉ. शिवाजी डोळसे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मिलिंद वाव्हळे करतील, तर डॉ. मधुकर वाकळे आभार मानतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे पदाधिकारी, जिल्हा शाखांचे प्रतिनिधी, प्राध्यापक, साहित्यिक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.फुले-शाहू-आंबेडकर-पेरियार यांचे परिवर्तनवादी विचार आणि बौध्द तत्वज्ञान हे भारतीय समाजात खोलवर रुजलेले आहे हे या व्याखनातून प्रतीत होणार आहे. तरी नागरिकांनी, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी, प्राध्यापकांनी, साहित्यप्रेमींनी आणि सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी या वैचारिक संवादात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. सामाजिक समता, बंधुता, विवेक आणि मानवी मुक्तीच्या विचारांना अधिक व्यापक करण्यासाठी अशा उपक्रमांना उपस्थितीच्या माध्यमातून बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.स्थळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागसेनवन, छत्रपती संभाजीनगर.शनिवार, दि.३१ ऑक्टोबर २०२६, सायंकाळी ५ वाजता.

## अय्युब पठाण यांना बालसाहित्य पुरस्कार जाहीर

**बिडकीन (प्रतिनिधी) :** हिंगोली येथील समृध्दी साहित्य संघ यांच्या वतीने दिला जाणारा यंदाचा संत नामदेव राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्कार सुप्रसिद्ध साहित्यिक तथा बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील लेखक आणि कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या रंगीत चित्रासह बालकविता असलेल्या " अंगत पंगत " या बालकाव्यसंग्रहासाठी पुरस्कार जाहीर झालेली आहे. असे हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनाचे संयोजक प्रा.डॉ. श्रीराम कऱ्हाळे मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली यांनी नुकतेच श्री. पठाण यांना पत्राद्वारे कळविले आहे. बालकांच्या भावविश्वाला मनोरंजनातून तथा प्रबोधनातून आनंद देणारा अतिशय दर्जेदार व आशयघन बालकविता असलेल्या " अंगत पंगत " या संग्रहात असून आतापर्यंत या संग्रहाला संत नामदेव बाल साहित्य हा सातवा राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्कार आहे. अय्युब पठाण लोहगावकर यांचे बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाला " कौतुकाची थाप " हा पाठ संपूर्ण महाराष्ट्राच्या प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. तसेच डॉ.बा.आं.म.विद्यापीठामध्ये बी.ए. तृतीय वर्षाच्या सहाव्या सत्राला मराठवाडी कविता म्हणून " गंध फुलांचा " ही कविता मराठवाड्यातील सर्व महाविद्यालयातील मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट आहे. अय्युब पठाण यांचे आतापर्यंत 15 पुस्तके प्रकाशित आहे. श्री.पठाण यांची संत नामदेव राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## बारवाले महाविद्यालयात विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत सुरू



**जालना (प्रतिनिधी) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नोव्हेंबर/डिसेंबर 2026 परीक्षेला बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात शिस्तबद्ध वातावरणात सुरुवात झाली आहे. प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, परीक्षा केंद्र प्रमुख प्रा. राजक्रांती वलसे, उपकेंद्र प्रमुख म्हणून प्रा.डॉ.माधव हेबाडे कार्यरत आहेत. अंतर्गत भरारी पथकामध्ये प्रा. डॉ. कल्याण कुंभार आणि प्रा. कांचन कायंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून अन्य कर्मचारी परीक्षेच्या नियमपालनावर सतत लक्ष ठेवून आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षा देताना कार्यालयीन अडचण येऊ नये यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रश्नपत्रिकांचे वितरण, पर्यवेक्षकांची नियुक्ती आणि उत्तरपत्रिकांचे संकलन या सर्व प्रक्रियेचे काटेकोर पालन केले जात आहे. जालना शहरातील विविध महाविद्यालयांमधून मोठ्या संख्येने विद्यार्थी येथे परीक्षेसाठी उपस्थित होत आहेत. विद्यार्थ्यांची तपासणी करूनच त्यांना परीक्षा कक्षात प्रवेश दिला जात आहे. परीक्षा केंद्राच्या कॉरिडॉर आणि कक्षांजवळ आरओ फिल्टर केलेले पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. परीक्षा केंद्रावर आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या शिस्त, सुरक्षा व सुयोग्य व्यवस्थापनामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून परीक्षा सुरळीतपणे सुरू आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६

# दुष्काळ : नैसर्गिक व सामाजिक आव्हान - डॉ. राजेंद्र बगाटे

दुष्काळ ही केवळ पावसाच्या अभावामुळे निर्माण होणारी नैसर्गिक आपत्ती नसून मानवी जीवन, सामाजिक व्यवस्था, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पर्यावरण यांची कसोटी पाहणारे गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात दुष्काळाचा विचार करताना या समस्येचे स्वरूप अधिक व्यापक असल्याचे लक्षात येते. राज्यातील शेतीचा मोठा भाग पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले किंवा त्याचे वितरण अनियमित झाले, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नापासून ग्रामीण कुटुंबांच्या दैनंदिन जीवनापर्यंत अनेक बाबींवर परिणाम होतो. पिण्याच्या पाण्याची टंचाई, पिकांचे नुकसान, जनावरांसाठी चाऱ्याचा अभाव, शेतमजुरांना काम न मिळणे, कर्जाचा वाढता भार आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतर या दुष्काळाच्या प्रमुख सामाजिक परिणामांपैकी काही आहेत. पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन असल्यामुळे त्याच्या उपलब्धतेतील घट संपूर्ण समाजाच्या जगण्यावर परिणाम करते. निसर्गातील पावसाचे चक्र मानवी नियंत्रणात नसले, तरी पाण्याचे नियोजन, जलस्रोतांचे संवर्धन, शेतीतील बदल आणि सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजनांच्या माध्यमातून दुष्काळाची तीव्रता कमी करता येते. म्हणूनच महाराष्ट्रातील दुष्काळाकडे केवळ नैसर्गिक संकट म्हणून न पाहता ते एक महत्त्वाचे सामाजिक, आर्थिक आणि विकासविषयक आव्हान म्हणून पाहणे आवश्यक आहे.महाराष्ट्राची भौगोलिक रचना, पर्जन्यमानातील प्रादेशिक तफावत आणि शेतीचे स्वरूप यांमुळे राज्यातील विविध भागांना वेगवेगळ्या प्रकारच्या जलसंकटांचा सामना करावा लागतो. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील कोकणात आणि घाटमाथ्यावरील काही भागांत तुलनेने अधिक पाऊस पडतो; परंतु सह्याद्रीच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी असते. मराठवाड्यातील अनेक भाग, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुके आणि विदर्भातील काही प्रदेश पावसाच्या अनिश्चिततेमुळे प्रभावित होतात. नाशिक जिल्ह्यातही पश्चिमेकडील डोंगराळ भाग आणि तुलनेने कमी पाऊस पडणारे पूर्वेकडील भाग यांच्यात पर्जन्यमानाची तफावत आढळते. त्यामुळे एकाच जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यांना पाणीटंचाईचे वेगवेगळे स्वरूप अनुभवावे लागू शकते. पावसाचे वार्षिक प्रमाण हा दुष्काळ समजून घेण्याचा एकमेव निकष नाही. पाऊस कोणत्या काळात पडतो, त्यामध्ये किती खंड पडतात, जमिनीतील ओलावा किती काळ टिकतो आणि भूजलसाठ्यांचे पुनर्भरण कितपत होते, या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. म्हणून महाराष्ट्रातील दुष्काळाचे नियोजन करताना संपूर्ण राज्यासाठी एकच उपाययोजना लागू करण्याऐवजी प्रत्येक प्रदेशाच्या भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीनुसार उपाययोजना आखणे आवश्यक आहे.महाराष्ट्राने वेगवेगळ्या काळांत पावसाच्या अनिश्चिततेमुळे निर्माण झालेल्या गंभीर संकटांचा सामना केला आहे. विशेषतः १९७२ चा दुष्काळ महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक इतिहासातील एक महत्त्वाचा संदर्भ मानला जातो. त्या काळात ग्रामीण भागातील मोठ्या लोकसंख्येला अन्नधान्य, पाणी आणि रोजगाराच्या प्रश्नांना सामोरे जावे लागले. शेतीचे नुकसान झाल्याने शेतकरी आणि शेतमजुरांच्या उपजीविकेवर परिणाम झाला. रोजगार हमीच्या कामांद्वारे ग्रामीण भागातील गरजू लोकांना काम उपलब्ध करून देण्याची संकल्पना पुढे येण्यात त्या काळातील अनुभवांचा महत्त्वाचा वाटा होता. त्या काळाच्या तुलनेत आज सिंचनाच्या सुविधा, रस्ते, दळणवळण, हवामानविषयक माहिती आणि कृषितंत्रज्ञान यांत बदल झाले आहेत. तरीही दुष्काळाचे आव्हान संपलेले नाही. आजही पावसातील दीर्घ खंड, भूजलाचा अतिवापर, पाण्याचे असमान वितरण आणि शेतीच्या वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबे संकटात सापडू शकतात. पूर्वीच्या दुष्काळात पाण्यासाठी लांब अंतर चालत जाणे, बैलगाड्यांद्वारे पाणी वाहून आणणे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या शोधात स्थलांतर करणे अशा समस्या दिसून येत होत्या. आज पाणीपुरवठ्याची साधने वाढली असली, तरी टँकरवरील अवलंबित्व, खोलवर गेलेल्या विहिरी, वाढलेला वीजखर्च आणि पाण्याच्या वापरातील विषमता या स्वरूपांत संकट कायम दिसू शकते. त्यामुळे भूतकाळातील अनुभवांचा अभ्यास करून वर्तमानातील दुष्काळ व्यवस्थापन अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेवर दुष्काळाचा सर्वाधिक परिणाम होतो. राज्यातील मराठवाडा आणि पावसावर अवलंबून असलेल्या इतर भागांत ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा, कापूस आणि सोयाबीन यांसारखी पिके घेतली जातात. पावसाचा खंड पडल्यास पेरणी उशिरा होते, दुबार पेरणीची वेळ येते किंवा उभ्या पिकांचे नुकसान होते. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण होते. शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी भांडवल उभे करणे आणि कर्जाची परतफेड करणे कठीण होते. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे आर्थिक राखीव साधने कमी असल्याने त्यांना या संकटाचा अधिक फटका बसतो. दुष्काळामुळे शेतीचे उत्पादन घटल्यास शेतमालाची आवक आणि बाजारपेठेतील व्यवहारही प्रभावित होऊ शकतात. मात्र, बाजारभावातील बदलांवर मागणी, साठवणूक, वाहतूक आणि व्यापारधोरणे यांचाही परिणाम होत असल्याने उत्पादन घटले म्हणजे प्रत्येक पिकाचा भाव त्याच प्रमाणात वाढेल असे नाही. या परिस्थितीत शेतकऱ्यांना हवामानविषयक माहिती, पीकविमा, वेळेवर नुकसानभरपाई, सुलभ कर्जव्यवस्था आणि पर्यायी रोजगार उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.महाराष्ट्रातील ऊसशेती आणि पाण्याच्या वापराचा प्रश्न दुष्काळाच्या चर्चेत विशेष महत्त्वाचा ठरतो. राज्यातील अनेक भागांत ऊस हा साखर उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. साखर कारखान्यांमुळे रोजगार, वाहतूक, शेतीपूरक व्यवसाय आणि स्थानिक आर्थिक व्यवहारांना चालना मिळते. मात्र, ऊस हे तुलनेने अधिक पाणी लागणारे पीक असल्यामुळे पाणीटंचाईग्रस्त भागांत त्याच्या लागवडीचे नियोजन अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. ज्या प्रदेशांत पाण्याची उपलब्धता मर्यादित आहे, तेथे भूजलसाठे आणि इतर जलस्रोत लक्षात न घेता पाण्याची मोठी गरज असलेल्या पिकांचा विस्तार केल्यास पाणीवापरावरील ताण वाढू शकतो. याचा अर्थ ऊसशेतीला सरसकट विरोध करणे असा नसून पीकपद्धती, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक पर्यावरण यांचा समतोल राखणे असा आहे. ठिबक सिंचन, पाण्याचे मोजून नियोजन, पीक फेरपालट आणि कमी पाण्यात येणाऱ्या पर्यायी पिकांचा विचार यांमुळे परिस्थितीनुसार पाण्याचा कार्यक्षम वापर करता येऊ शकतो. शेतीविषयक निर्णय घेताना शेतकऱ्यांना केवळ पीक बदलण्याचा सल्ला देऊन चालणार नाही; त्यांना बाजारपेठ, प्रक्रिया उद्योग, तांत्रिक मार्गदर्शन आणि आर्थिक मदत यांचा आधारही मिळणे आवश्यक आहे.दुष्काळाचा परिणाम महाराष्ट्रातील शेतमजुरांच्या जीवनावरही गंभीर स्वरूपात दिसून येतो. शेतीतील पेरणी, निंदणी, कापणी आणि इतर कामे कमी झाल्यामुळे मजुरीच्या संधी घटतात. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे रोजंदारीवर अवलंबून असल्यामुळे काम न मिळाल्यास अन्नधान्य, औषधे, घरखर्च आणि मुलांचे शिक्षण यांसाठी आवश्यक पैसा उपलब्ध होत नाही. विशेषतः भूमिहीन कुटुंबांकडे शेतीतून मिळणारे पर्यायी उत्पन्न नसल्याने त्यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. काही कुटुंबे पुणे, मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि इतर औद्योगिक किंवा बांधकाम क्षेत्रांकडे रोजगारासाठी स्थलांतर करतात. स्थलांतरामुळे तात्पुरते उत्पन्न मिळू शकते; परंतु त्यातून असुरक्षित कामाच्या परिस्थिती, अपुऱ्या निवासव्यवस्था, आरोग्यसेवेचा अभाव आणि मुलांच्या शिक्षणात खंड पडण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. ऊसतोडणीसाठी हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांनाही मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि निवास यांचे प्रश्न भेडसावू शकतात. त्यामुळे दुष्काळनिवारणाचा विचार करताना शेतीला मदत देण्याबरोबरच शेतमजुरांसाठी स्थानिक रोजगार, रोजगार हमीची प्रभावी अंमलबजावणी आणि स्थलांतरित कुटुंबांसाठी सामाजिक संरक्षण यांनाही प्राधान्य द्यावे लागते.दुष्काळ ही सामाजिक विषमता वाढविणारी परिस्थितीही ठरू शकते. आर्थिकदृष्ट्या सक्षम शेतकऱ्यांना विहिरी, सिंचनाची साधने, पाण्याची साठवणूक किंवा पर्यायी व्यवसाय यांचा आधार मिळू शकतो; परंतु लहान शेतकरी आणि भूमिहीन कुटुंबांकडे असे पर्याय मर्यादित असतात. पाणीटंचाई निर्माण झाल्यास गावातील सर्व वस्त्यांना समान प्रमाणात पाणी मिळतेच असे नाही. मुख्य वस्तीच्या तुलनेत दूरवर असलेल्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचण्यास अडचणी येऊ शकतात. सामाजिकदृष्ट्या वंचित कुटुंबांना पाण्याच्या स्रोतांपर्यंत पोहोचताना अधिक अडथळे येण्याची शक्यता असते. त्यामुळे पाण्याचे वितरण केवळ उपलब्धतेवर आधारित न ठेवता सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित असणे आवश्यक आहे. प्रत्येक गावातील सर्व वस्त्या, गरीब कुटुंबे आणि वंचित घटक यांना सुरक्षित पाणी मिळेल याची खात्री करणे हे स्थानिक प्रशासनाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. दुष्काळाच्या काळात पाणी, अन्न आणि रोजगार या मूलभूत गरजांबाबत पारदर्शकता राखल्यास सामाजिक संघर्ष कमी करता येऊ शकतात.दुष्काळाचा महिलांच्या जीवनावर विशेष परिणाम होतो. महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागांत पिण्याचे पाणी आणण्याची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवर असते. विहिरी किंवा पाण्याचे टँकर दूरवर असल्यास त्यांना पाणी मिळविण्यासाठी अधिक वेळ आणि श्रम खर्च करावे लागतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि शिक्षण, रोजगार किंवा इतर विकासाच्या संधींसाठी उपलब्ध असलेला वेळ कमी होतो. कुटुंबाचे उत्पन्न घटल्यास घरखर्चाचे नियोजन, मुलांचे संगोपन आणि अन्नाची व्यवस्था करण्याचा अतिरिक्त भार महिलांवर पडतो. गर्भवती महिला, लहान मुले, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना पाणीटंचाईच्या काळात अधिक अडचणी येऊ शकतात. पाण्याची गुणवत्ता खालावल्यास जलजन्य आजारांचा धोका वाढतो. म्हणूनच पाणीपुरवठ्याच्या नियोजनात महिलांचा सहभाग, आरोग्यसेवा, पोषण आणि स्वच्छता यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. पाणीवाटपाच्या समित्यांमध्ये महिलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतल्यास स्थानिक गरजांची अधिक परिणामकारक ओळख होऊ शकते.दुष्काळाचा पशुधनावर आणि पर्यावरणावरही गंभीर परिणाम होतो. पाऊस कमी पडल्यास गवताची वाढ खुंटते, चाऱ्याचे उत्पादन घटते आणि जनावरांसाठी पाणी मिळविणे कठीण होते. चारा आणि पशुखाद्याच्या किमती वाढल्यामुळे पशुपालकांचा खर्च वाढतो. आर्थिक अडचणींमुळे काही शेतकऱ्यांना जनावरे विकावी लागतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला आर्थिक आणि सामाजिक महत्त्व असल्यामुळे त्याचे नुकसान म्हणजे भविष्यातील उत्पन्नाचा आधार कमकुवत होणे होय. पर्यावरणाच्या दृष्टीने जंगलतोड, जमिनीची धूप, पाणलोट क्षेत्रांचे नुकसान आणि भूजलाचा अतिवापर यांमुळे पाणीटंचाईची तीव्रता वाढू शकते. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वेगाने वाहून गेल्यास भूजल पुनर्भरण कमी होते. तापमानातील वाढ आणि पावसाच्या वितरणातील अनिश्चितता यांमुळे काही प्रदेशांतील दुष्काळाचा धोका वाढू शकतो. तथापि, प्रत्येक दुष्काळाचे कारण केवळ हवामानबदल आहे असे म्हणता येत नाही. स्थानिक हवामान, जमिनीचा वापर, जलव्यवस्थापन आणि मानवी हस्तक्षेप या सर्व घटकांचा एकत्रित विचार करावा लागतो.महाराष्ट्रात दुष्काळाचा सामना करण्यासाठी जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास आणि भूजल पुनर्भरण यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी स्थानिक परिसरात अडविणे, जमिनीत मुरविणे आणि योग्य पद्धतीने साठविणे यामुळे जलसुरक्षा वाढविता येते. नालाबंधारे, मृद्‌बंधारे, शेततळी, समतल चर, पुनर्भरण विहिरी आणि छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन अशा उपाययोजना स्थानिक परिस्थितीनुसार उपयुक्त ठरू शकतात. महाराष्ट्रात जलयुक्त शिवारसारख्या जलसंधारण उपक्रमांमधून पाणी साठवणूक आणि जलस्रोतांच्या बळकटीकरणाला महत्त्व देण्यात आले आहे. अशा उपक्रमांचे मूल्यमापन करताना केवळ झालेली कामे किंवा खर्च यांचाच विचार न करता प्रत्यक्ष पाणी उपलब्धतेत झालेला बदल, भूजल पुनर्भरण, कामांची टिकाऊपणा आणि स्थानिक समुदायाला मिळालेला लाभ यांचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. कोणतीही जलसंधारणाची रचना उभारल्यानंतर तिची देखभाल, गाळ काढणे आणि योग्य वापर यांकडे दुर्लक्ष झाल्यास अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. म्हणूनच ग्रामपंचायती, शेतकरी गट आणि स्थानिक नागरिक यांच्या सहभागातून जलस्रोतांचे नियोजन व संवर्धन करणे गरजेचे आहे.दुष्काळाच्या काळात महाराष्ट्र शासन आणि स्थानिक प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पाणीटंचाईग्रस्त गावांची वेळेवर ओळख, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि रोजगार उपलब्ध करून देणे या तातडीच्या उपाययोजना आहेत. पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पीकविमा आणि नुकसानभरपाई मिळणे, ग्रामीण कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आणि गरजू व्यक्तींना अन्नसुरक्षेचा आधार मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील रोजगार हमीविषयक योजना आणि विविध जलसंधारण कार्यक्रम ग्रामीण भागाला आधार देऊ शकतात. मात्र, योजनांचे यश त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असते. मदत वेळेवर मिळते का, पाणी गरजू वस्त्यांपर्यंत पोहोचते का, निधीचा योग्य वापर होतो का आणि केलेल्या कामांची गुणवत्ता टिकून राहते का, या बाबींची नियमित तपासणी आवश्यक आहे. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे. संकटाच्या काळातील मदतीबरोबरच दुष्काळपूर्व तयारी, पाण्याचे अंदाजपत्रक आणि दीर्घकालीन जलनियोजन यांनाही समान महत्त्व दिले पाहिजे.दुष्काळावर मात करण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे आवश्यक आहे. हवामानाचा अंदाज, पर्जन्यमानाची नोंद, भूजलपातळीचे निरीक्षण आणि पिकांच्या स्थितीचे मूल्यमापन यांच्या मदतीने संभाव्य संकटाची पूर्वकल्पना मिळू शकते. ही माहिती शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर आणि समजण्यास सोप्या भाषेत पोहोचल्यास पेरणी, पीकनिवड आणि पाण्याच्या वापराबाबत योग्य निर्णय घेता येतात. प्रत्येक गावाने उपलब्ध पाणी, संभाव्य गरजा आणि पाणीवापराचे प्राधान्यक्रम यांचा आढावा घेऊन स्थानिक जलनियोजन करावे. घरगुती वापरात पाण्याची बचत करणे, गळती रोखणे, पावसाचे पाणी साठविणे आणि जलस्रोत स्वच्छ ठेवणे या साध्या कृतीही महत्त्वाच्या आहेत. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामपंचायती यांच्या माध्यमातून जलसाक्षरता वाढविल्यास पाण्याबद्दल सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण होऊ शकते. पाण्याची जबाबदारी केवळ शासनाची किंवा शेतकऱ्यांची नसून समाजातील प्रत्येक घटकाची आहे.महाराष्ट्रातील दुष्काळाचे आव्हान पेलण्यासाठी तात्पुरत्या मदतीबरोबरच दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक धोरणाची आवश्यकता आहे. पाण्याची उपलब्धता, शेतीचे स्वरूप, ग्रामीण रोजगार, सामाजिक विषमता आणि पर्यावरणसंवर्धन यांचा एकत्रित विचार केल्याशिवाय दुष्काळावर कायमस्वरूपी मात करता येणार नाही. पावसाचे प्रमाण आपल्या नियंत्रणात नसले, तरी पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजलाचा विवेकपूर्ण वापर, योग्य पीकपद्धती, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि संकटग्रस्तांना वेळेवर मदत या बाबी मानवी प्रयत्नांच्या कक्षेत येतात. शेतकरी, शेतमजूर, महिला, मुले, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्ती यांच्या गरजांकडे लक्ष देणे ही दुष्काळ व्यवस्थापनातील सामाजिक जबाबदारी आहे. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, संशोधन संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास दुष्काळाची तीव्रता कमी करणे शक्य आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, जमिनीची सुपीकता टिकविणे आणि नैसर्गिक संसाधनांचा न्याय्य वापर करणे ही केवळ आजची गरज नाही, तर पुढील पिढ्यांच्या सुरक्षित जीवनाची हमी आहे. महाराष्ट्राच्या दुष्काळग्रस्त भागांना जलसुरक्षित बनविण्यासाठी निसर्गाशी समतोल राखणारी विकासदृष्टी, पारदर्शक प्रशासन, वैज्ञानिक नियोजन आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे आवश्यक आहे. दुष्काळाला केवळ नैसर्गिक संकट न मानता सामाजिक परिवर्तनाची आणि शाश्वत विकासाची दिशा ठरविणारे आव्हान मानले, तर जलसंपन्न, सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या न्याय्य महाराष्ट्राच्या निर्मितीकडे वाटचाल करता येईल.

**डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**
**bagate.rajendra5@gmail.com**